# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १४/०१/२०२० रोजी (का.प.क्र.०७) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक १४/०१/२०२० रोजी (का.प.क्र.०७) मा.सभापती श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त श्री.रविंद्र निकम, नगर सचिव, श्री.डि.डि.सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्री.राजु रामराव शिंदे |
| ०३. | स.स.श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ०४. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०५. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०६. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०७. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०८. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ०९. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| १०. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ११. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |
| १२. | स.स.श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |

श्री.गजानन बारवाल : शहरामध्ये जशी पाण्याची समस्या चालू आहे तशी माझ्या वार्डमध्ये पाण्याची समस्या आहे. प्रयत्न सुध्दा अधिकाऱ्यानी थोडयाफार प्रमाणात केले. परंतु काम थांबवलेले आहे. शिल्पनगर पदमपुऱ्यातील भाग, लक्ष्मीवाडीचा भाग या ठिकाणी पाण्याची समस्या चालु आहे ज्या ठिकाणी पाणी येते घाण आणि दुषित पाणी येते. पदमपुऱ्यामध्ये वारंवार पाण्याची समस्या आहे. विभागाचे गायकवाड साहेब येऊन काम बघून जातात. सांगतात की बजेट नाही. ठेकेदारही काम करायला तयार नाही. सर्व कामे थांबवुन ठेवली जातात.

मा.सभापती : संबधित अधिकाऱ्याने खुलासा करावा.

उपअभियंता(पा.पु) : शिल्पनगरमध्ये जुनी ३ इंचाची लाईन आहे. आता तिथे नवीन अर्पाटमेंट झालेले आहे. तर ४ इंचाची लाईन टाकण्या करीता चार लाख पंचेचाळीस हजाराचे इस्टीमेट तयार करण्यात आलेला आहे. प्रशासनाची कार्यवाही चालु आहे.

श्री.गजानन बारवाल : मी ज्या भागाचा उल्लेख केला त्या भागात लाईट असते असे असतांना पाणी का येत नाही ते काम थांबलेले आहे.

उपअभियंता(पा.पु) : मेंटेनन्स मध्ये जर चार इंचाचे ए.सी. पाईप मिळाले तर ते काम करून घेण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : दिड वर्षापासून याबाबत सांगतो आहे मागच्या भागात पाणी येते काही भागाचे पाणी का येत नाही. २० दिवस झाले काम बंद आहे.

उपअभियंता(पा.पु) : गल्लीचा पाण्याची जी समस्या सोडवायची होती तसेच पदमपुऱ्यामध्ये दुसरी समस्या सोडविली होती तशी दुसरी पाईपलाईन टाकुन समस्या सोडवली जाईल.

मा.सभापती : स.बारवाल साहेबांनी ज्या सुचना दिल्या त्याची लवकर कारवाई व्हावी.

श्री.राजेंद्र जंजाळ : विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

**विषय क्र. ५८ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, नागरी हिवताप योजना मलेरीया विभागांतर्गत किटकजन्य साथ प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी खालील दर्शविलेल्या अळीनाशक, किटकनाशक औषधांची आवश्यकता आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षा करीता क-३ मलेरीया विभाग ६३२२५३२००३, ई-३१, औषध खरेदी लेखाशिर्ष तरतूद रक्कम रू.५० लक्ष इतकी आहे. सदरील खरेदी ही मुख्य भांडार विभाग महानगरपालिका मार्फत ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

खालीलप्रमाणे अळीनाशक, किटकनाशक खरेदी करण्याची आवश्यकता आहे.

| **अ. क्र.** | **अळीनाशक/किटकनाशक औषधाचे नाव** | **एकूण मागणी** | **प्राप्त दर/लिटर** | **एकूण अंदाजीत खर्च** |
|---|---|---|---|---|
| ०१. | अबेट (टेमिफॉस ५० टक्के) | १२०० लिटर्स | रू.१५५०/- | १८,६०,०००/- |
| ०२. | बी टी आय लिक्विड | ३०० लिटर्स | रू.२१००/- | ६,३०,०००/- |
| ०३. | सायफिनोथ्रीन ५ टक्के | ९५० लिटर्स | रू.१५००/- | १४,२५,०००/- |
| ०४. | एम एल ओ ऑईल | १०० लिटर्स | रू.५००/- | ५,००,०००/- |
| | | | **एकूण :-** | **४४,१५,०००/-** |

सदरील अळीनाशक, किटकनाशक खरेदीचा अंदाजीत खर्च रक्कम रू.४४,१५,०००/- (चौरेचाळीस लाख पंधरा हजार रूपये फक्त) इतका अपेक्षित आहे. करीता अळीनाशक, किटकनाशक औषधी ई-निविदा पध्दतीद्वारे खरेदी करण्यास्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

प्र.जीवशास्त्रज्ञ (सौ.राणे) : किटकनाशक खरेदी प्रस्तावामध्ये अ.क्र.४ वर एमएलओ ऑईल १०० लिटर्स खरेदी करणे या ऐवजी १००० लिटर्स खरेदी करणे अशी दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.सभापती : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी हिवताप योजना मलेरीया विभागांतर्गत किटकजन्य साथ प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी प्रस्तुत प्रस्तावातील अळीनाशक, किटकनाशक औषधांची खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४४,१५,०००/- (चौरेचाळीस लाख पंधरा हजार रूपये फक्त) अपेक्षित अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते.तसेच अ.क्र.४ वर एमएलओ ऑईल १०० लिटर्स खरेदी करणे या ऐवजी १००० लिटर्स खरेदी करणे अशा दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संजय शंकरराव कोलते, कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग यांनी स्वतःच्या मुत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant) या आजारपणावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार घेतले आहे. संबंधीतांनी सदर आजारपणावर झालेल्या वैद्यकीय खर्चाचे देयके दाखल केले असून सदर वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.५,६१,७७८/- च्या ९० टक्के रक्कम रू.५,०५,६००/- (अक्षरी रू.पाच लाख पाच हजार सहाशे मात्र) पैकी ५ टक्के रक्कम रू.२८,९३६/- (अक्षरी रू.अठ्ठावीस हजार नऊशे छत्तीस मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.५,७८,७२५/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.४,७६,६६४/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार सहाशे चौसष्ट मात्र) प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून रक्कम अदा केलेली नाही.

करीता श्री.संजय शंकरराव कोलते, कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग यांनी स्वतःच्या मुत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant) या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय खर्चाची रक्कम रू.४,७६,६६४/- या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र ५९ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संजय शंकरराव कोलते, कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग यांनी स्वतःच्या मुत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant) या आजारपणावर सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, औरंगाबाद येथे घेतलेल्या उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.५,६१,७७८/- च्या ९० टक्के

रक्कम रू.५,०५,६००/- (अक्षरी रू.पाच लाख पाच हजार सहाशे मात्र) पैकी ५ टक्के रक्कम रू.२८,९३६/- (अक्षरी रू.अठ्ठावीस हजार नऊशे छत्तीस मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.५,७८,७२५/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.४,७६,६६४/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार सहाशे चौसष्ट मात्र) या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.राजु शिंदे : घनकचऱ्याचे प्रमुख कोण आहे ज्यांचा विषय आहे ते जर इथे नसतील तर हा स्थायी समितीचा अवमान आहे. एकतर स्थायी समितीने एखादया वेळी काही निर्णय दिला असेल. आणि त्याची ते अमलबजावणी करीत नसतील आणि अमलबजावणी न करता स्थायी समितीच्या मिटींगच्या ऐनवेळी ती विषय पत्रिका सचिवांकडे येत असेल आणि घनकचरा प्रमुख इथे उपस्थित नसेल तर मला असे वाटते त्यांना त्यांच्या विषयाबद्दल काही गांभिर्य दिसत नाही. म्हणून अश्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात यावी. आणि विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा. मागच्या वेळी रूलींग दिली होती की हा विषय रिकॉल करण्यात यावा. त्याच्या संदर्भात काय झाले त्याची माहीती सुध्दा सभागृहात देण्यात यावी ती माहीती देण्याकरीता जर सभागृहात स्वतः अधिकारी उपस्थित नसतील आणि विषय पत्रिका पाठवून देत असतील तर हा सभागृहाचा आणि सभापतीचा अवमान आहे. आणि अश्या संबधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : हर्सुल येथे कचऱ्याचा प्रकल्प उभारण्यात आला. अपडेट मध्ये जे रिकॉल केले होते ते आपल्या समोर यायला पाहिजे होते.

राजु शिंदे : त्या प्रस्तावावर प्रशासनाने पुढे काय कार्यवाही केली.

श्रीमती सायरा बानो :श्री.भोंबे साहेब मिटींगला येत नाही. फोनही उचलत नाही हा विषय घेण्यात येऊ नये. ते त्यांची जबाबदारी निट पार पाडत नाही कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ : या शहरातील कचऱ्याचा विषय फार महत्वाचा आहे. आणि मा.मुख्यमंत्री साहेबांनी जी आढावा बैठक आत्ताच काही दिवसांपुर्वी घेतली त्यामध्ये हा विषय चर्चेला गेला होता. आणि प्रकल्पाला जो उशिर होत आहे त्याला महानगरपालिकेच्या स्थायी समितीला जबाबदार धरण्यात येत आहे. त्या विषयांवर चर्चा करण्यापेक्षा माझी विनंती आहे की तो विषय पटलावर घेण्यात यावा. आणि प्रशासनाने का उशिरा आणला का उशिर झाला असे विषय सभागृहामध्ये अनेक वेळी चर्चेला जातात याचे उत्तर शेवटपर्यंत कोणाला मिळत नाही. त्या टेंडर बद्दल माहिती देण्यासाठी भोंबे साहेबांनी कोल्हे साहेबांना पाठवलेले आहे. अशी माझी माहिती आहे. तो विषय आजच्या या सभागृहामध्ये मंजुर करण्यात यावा. कारण त्या कामाला गती मिळणे आवश्यक आहे. या शहरामध्ये कचऱ्याचा जो मुख्य प्रश्न आहे त्याच्यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. मागच्या वेळी प्रस्ताव फेटाळण्यात आला होता. तोच पुर्नविचारासाठी आपल्या समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. माझी सर्व सदस्यांची विनंती आहे की तो ठराव पटलावर घेऊन त्याला आज मान्यता देण्यात यावी. जेणे करून त्या कामाला गती प्राप्त होईल की या शहरामध्ये कचऱ्याचे ढीग परत उभे राहण्याची शक्यता आहे. कारण प्रोसेसिंग युनिट उभे राहणे त्याला पण काही कालावधी आवश्यक असतो तर आपण जास्त वेळ न घालता कारण हा पैसा शासनाने दिलेला आहे. आपल्याला जागा आज मिळालेली आहे. कारण त्या माणसांची माणसिकता जर बदलली तर त्या जागेला जर त्यांनी विरोध केला तर फार मोठी अडचण या ठिकाणी निर्माण होईल. त्यासाठी आमची सर्वाची विनंती आहे की तो विषय पटलावर घेऊन मंजुरी देण्यात यावी. काम मार्गी लागण्यास मदत होईल.

श्री.गजानन बारवाल : आगोदरच तो प्रस्ताव आपण रिकॉल केला आहे. रिकॉल केल्यानंतर त्यावर कारवाई केली याची माहीती समोर येऊ दया. तो जसाच तसा नका ठेऊ. आपल्या समोर सुध्दा तो विषय ऐनवेळी आलेला नाही याचा अर्थ काय संबंधित अधिकारी येथे उपस्थित नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ : तो विषय पटलावर घेणार आहे की नाही. घेणार नसेल तर तसे स्पष्ट सांगावे.

श्री.नासेर सिद्दिकी : एजन्सीला आपण १५ दिवसांचा कालावधी पण दिला होता. तीन महीने झाले आजपर्यंत त्याची माहीती सभागृहाला दिलेली नाही.

श्री.राजु शिंदे : अनेक दिवसांपासुन या शहरामध्ये कचऱ्याच्या समस्या सोडविण्यासाठी मा.देवेंद्र फडणवीस साहेबांनी मा.आयुक्त निपुण विनायक साहेबांना पाठविले होते. त्याच्या माध्यमातुन २-३ ठिकाणी प्रकल्प उभे राहण्याची तयारी सुध्दा झाली मधल्या काळात हर्सुलचा आणि पडेगाव मिटमिट्याचा या विषयी सुध्दा बराच वाद होता. हर्सुलचा मागच्या वेळी टेंडर झाले टेंडर झाल्यानंतर एजन्सीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्या प्रश्नचिन्हावर या सभागृहामध्ये काही माहीती मागविण्यात आली. त्या एजन्सिला ते काम देण्यात आले की ती एजन्सि नगर मध्ये ज्या काही चौकश्या लावल्या होत्या त्याच्याबद्दल जी काही माहिती मागितली होती. याचे समाधानकारक उत्तर प्रशासनाने दिले नव्हते. त्यामुळे त्यावेळी स्थायी समितीने टेंडर रिकॉल करण्याचे सांगितले होते. अत्यंत महत्वाचे काम असताना सुध्दा प्रशासनाने गांभिर्य न घेतल्यामुळे मागच्या अडीच-तीन महिन्यानंतर रिकॉल केल्यानंतर सुध्दा प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. हे स्थायी समितीला पाठविले याच्या आगोदर सुध्दा स्टॅन्डिंग कमिटीच्या २-३ मिटींग झाल्या तरी ते आले नाही. मा.मुख्यमंत्री शहराचा आढावा घेण्यासाठी आले होते त्यांनी त्याच्यामध्ये विषय काढल्यानंतर त्या विषयामध्ये स्थायी समितीला दोषी धरण्यात आले मला असे वाटते स्थायी समिती, सर्वसाधारण सभा, पदाधिकारी यांचा किती रोल आहे हे उपमहापौर साहेबांना सुध्दा माहीती आहे. परंतु ज्या प्रशासनाला गांभिर्य नाही त्या गोष्टीच ज्या विषयाच ते प्रशासन अडीच ते तीन महिने झाल्यानंतर सुध्दा पाठविले नाही नियमानुसार पुन्हा जर पाठवायचे तर १५ दिवसांच्या मुदतीमध्ये त्यांनी पाठविले पाहिजे होते. १५ दिवसांमध्ये पाठविले नाही. आता मा.मुख्यमंत्र्यांनी आल्यानंतर आढावा घेतल्यानंतर जाग येत असेल तर मला असे वाटते या शहरासाठी अत्यंत वाईट अनुभव स्थायी समितीला आणि सर्वसाधारण सभेला आलेला आहे. ज्या अधिकाऱ्याने स्थायी समितीला आगोदर कळवायला पाहिजे होते. संध्याकाळी तरी स्थायी समितीच्या सदस्यांना किंवा सभापतीला पाठवायला हवे होते. त्या सभेला संबधित अधिकाऱ्याने उपस्थित रहायला पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : याबाबत मा.सी.एम साहेब काय बोलले ते बघण्यात यावे. यात दिशाभुल करण्यात येऊ नये.

श्री.राजेंद्र जंजाळ : याच्यामध्ये दिशाभुल करण्याचा प्रश्नच नाही याच्यामध्ये कोणाला किती इंटरेस्ट आहे हे मला या सभागृहामध्ये बोलायला लावू नये.

श्री.राजु शिंदे : जंजाळ साहेब तुम्ही सुध्दा स्थायी समितीचे सदस्य आहे. तुम्हाला सुध्दा माहिती पाहिजे की आपण ज्या कंपनीला काम देत आहे ती कंपनी काम करू शकते की नाही तर ज्या कंपनीची निवीदा तुम्ही मंजुर करत आहे. ती कंपनी ज्या ठिकाणी काम करत आहे तीचे काम कसे आहे. त्याचा अहवाल आला का? नागरिकांची काही माहिती होती. मी मागच्या स्थायी समितीमध्ये विचारली त्याचे समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे आपण रिकॉल केले होते किमान त्यांनी तिथे जाऊन माहिती विचारून चौकशी करून त्यांनी इथे जर सांगितले असते की ही कंपनी काम देण्यास योग्य आहे. तीचा अनुभव ऐवढा आहे. तर आपण त्याचा विचार केला असता. परंतु तिथल्या आमदारांनी, विभागीय आयुक्तांनी, आयुक्तांनी आणि महाराष्ट्र शासनाचे उपसचिव यांनी सुध्दा त्या एजन्सीचा अहवाल मागितलेला आहे. ॲन्टी करपशनची चौकशी चालु असताना अशा एजन्सिला काम देणे योग्य आहे की नाही. नगर सोडून या एजन्सिचे कुठेच काम चालु नाही. हीचा अनुभव अत्यंत वाईट आहे या एजन्सिला ३ लाख रू दंड झालेला आहे आणि आग लागलेली आहे तिथे आणि बरेचसे नुकसान महानगपालिकेचे झालेले आहे शेड जळालेला आहे. आणि त्या एजन्सिची चौकशी

चालु आहे आणि या एजन्सिने आत्तापर्यंत कुठे कुठे काम केले आहे. समाधानकारक काम केले आहे याचा आपले अधिकारी तेथे जाऊन आले की नाही. याचा सभागृहामध्ये समाधानकार खुलासा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ : माझे ऐवढेच विचारणे आहे की हा विषय आपण पटलावर घेणार आहे की नाही?

श्री.राजु शिंदे : मा.मुख्यमंत्री साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ही एजन्सि मंजुर करा आपण नक्की मंजुर करू परंतु अधिकाऱ्यांनी त्या एजन्सिबद्दल स्पष्ठता केली पाहिजे ही एजन्सी काम करण्यास पात्र आहे की नाही. एजन्सि काम करू शकते की नाही. आपले शहर मोठे आहे त्या शहरापेक्षा आणि आपल्या पुर्ण शहराचा आढावा बघता आपले जे काही मागच्या स्कीम बघता अत्यंत वाईट अनुभव आहे. त्यामुळे आपण अजुन दुसऱ्या कंपनीला घाईगडबडीत काम दिल्यापेक्षा माझ्या माहितीप्रमाणे तिथे अजुन प्रदुषण नियंत्रण मंडळाची पण मान्यता नाही. सिव्हिल वर्कची अजून निविदा केली नाही दोन्ही संयुक्त निविदा काढा. एकीकडे सिव्हिलचे काम चालेल एकीकडे मशीनचे काम चालेल. या निविदा आपण मागितल्या तर या निविदेचे जे कोणे अधिकारी यात प्रमुख आहे. जे अधिकारी याच्यावर काम करत आहे त्यांनी आपल्याला स्पष्ट सांगितले पाहिजे की ही कंपनी योग्य आहे की नाही त्याच्यानंतर आपण ठरवू. स्थायी समितीची वेळ ११:३० ची आहे विषय पत्रिका निघालेली नाही. आणि अधिकारी वंदे मात्रम झाल्यानंतर सभागृहात येतात हे सुध्दा चुकीचे आहे या विषयाला आता सध्या तरी स्थगिती ठेवावी.

श्री.गजानन बारवाल : परंतु टेंडर रिकॉल केलेले आहे त्याचे काय?

श्री.राजु शिंदे : जसे तुम्हाला गांभिर्य आहे. मा.मुख्यमंत्री साहेबांना गांभिर्य आहे तसे अधिकाऱ्यांना सुध्दा असायला पाहिजे. अधिकाऱ्यांना सुध्दा माहिती पाहिजे या शहरामध्ये कचरा प्रश्न अत्यंत वाईट आहे. निविदा मार्गी लावायला पाहिजे आणि इंटरेस्टचा विषय तर आपण ते ऑनलाईन करायचे की कसे करायचे ते बघू. स्थायी समितीला अधिकार आहे एकजन्सि फिक्सिंग करण्याचा एजन्सी फिक्सिंग करताना कोणतीही निवीदा ५० लाखाची स्थायी समितीला येणे बंधणकारक आहे. स्थायी समितीला निवीदा आली म्हणजे तिच्यामध्ये काही इंटरेस्ट असतोच असे नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ : स्थायी समितीचे सदस्य राजु शिंदे यांनी विस्तृत अशी या विषयबद्दल चर्चा केलेली आहे. माझा सर्वात पहिले मुख्य प्रश्न असा होता की याठिकाणी ऐनवेळचा जो ठराव घेतलेला आहे याचे उत्तर देण्यात यावे.

मा.सभापती : ऐनवेळचा प्रस्ताव माझ्याकडे ११:२३ ला आलेला आहे आणि त्याचे संबंधित अधिकारी भोंबे साहेब उपस्थित नाही कोल्हे साहेब व्यवस्थित खुलासा देऊ शकत नाही. कोल्हे साहेब व्यवस्थित खुलासा देऊ शकत नाही. त्यामुळे हा प्रस्ताव घेण्यात येत नाही. मा.मुख्यमंत्री साहेबांनी जे आपल्याला मिटींगच्या वेळी सांगितले आहे माझे त्यांच्याशी बोलणे झालेले आहे. शहराच्या विकासासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या शब्दाचा मलाही मान आहे आणि आपण या विषया संदर्भात २-३ दिवसात मिटींग लावू आणि हा प्रश्न आपल्याला लवकरच मार्गी लावायचा आहे आणि त्यासाठी आपल्या सगळया सहकाऱ्यांचे सहकार्य पाहिजे आणि ज्या वेळी ही मिटींग लावल्या जाईल त्यावेळी भोंबे साहेब खुलासा करण्यासाठी हजर राहीले पाहिजे नाही तर त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल.

श्री.राजेंद्र जंजाळ : या आगोदर नगरला झाले तो विषय वेगळा होता आणि आपल्याकडचा विषय वेगळा आहे.

मा.सभापती : नाही आपण त्या नगरच्या विषयाला विरोध केला त्या वेळी सर्व सदस्यांनी विरोध केला होता.

श्री.राजेंद्र जंजाळ : मला आपली भुमिका लक्षात आलेली आहे. ज्यावेळी हा विषय पटलावर येईल त्यावेळी आम्ही सर्व सदस्य येवू.

श्री.राजु शिंदे : सचिव सांगतील एखादा विषय रद्द केला आणि रिकॉल केल्यानंतर वापस येत असेल तर त्याला काही नियम असेल तर आपण त्यावर विचार करू.

मा.नगरसचिव : महानगरपालिकेने पारित केलेल्या ठरावात तो पारित झाल्यानंतर ३ महिन्यात (सचिव नियम वाचन करतात)

श्री.राजु शिंदे : आपल्याला नोटीस आली आहे का?

मा.सभापती : नाही आली.

श्री.राजु शिंदे : विना नोटीस कसे आपण स्थायी समितीला ठराव पाठवित आहे. कोल्हे साहेब उत्तर दयावे.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशने पुर्नविचारासाठी आपल्यासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री.राजु शिंदे : ठेवायचे जर असेल तर डीस्टब पत्र दयावे लागते. तुम्हाला नियम माहिती आहे का?

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : माहित आहे.

श्री.राजु शिंदे : माहित आहे तर आत्ताच सचिव साहेबांनी सांगितले त्या नियमात का नाही पाठविले.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : सचिव साहेबांना आम्ही फाईल पाठविली त्यांनी तर आम्हाला परत केली असती आम्ही त्याचे लगेच उत्तर दिले असते.

श्री.राजु शिंदे : तुम्हाला जर नियम माहिती आहे तर तुम्ही पाठवायला पाहिजे की असा प्रस्ताव तुमच्याकडे आम्हाला पाठवायचा आहे. त्या दिवशी स्थायी समितीने हा ठराव रद्द केला आणि रिकॉल करायची प्रोसेस चालु करायला सांगितले आता पर्यंत काय कार्यवाही केली.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : ती प्रोसेस चालू केली होती.

श्री.राजु शिंदे : प्रोसेसला किती दिवस लागायला पाहिजे.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : फाईल मंजुरीसाठी गेली आहे.

श्री.राजु शिंदे : कोणाची मंजुरी लागते.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : आयुक्तांची मंजुरी लागते.

श्री.राजु शिंदे : किती दिवस झाले आयुक्तांना येऊन. प्रशासनाला अडीच महिने झाले हा विषय रद्द करून नवीन प्रक्रिया राबवा म्हणून. अडीच महिण्यामध्ये नवीन प्रक्रिया राबवू शकत नाही. नंतर तोच विषय सभागृहामध्ये पाठवत असेल तर हे सभागृह नियमाने चालणारे आहे. विना नियमाचा ठराव पाठवत असाल तर घेणार आहे का तुम्ही. या कंपनीची माहिती आहे की या कंपनीला ३ लाख रूपयाचा दंड आहे आणि कंपनीचे कुठेच काम चालू नाही. चौकशी चालू असताना तुम्ही त्याला नवीन काम कसे देता.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : मा.मुख्यमंत्री साहेबांनी सांगितले.

श्री.राजु शिंदे : मा.मुख्यमंत्री साहेबांनी असे सांगितले आहे का की त्याच एजन्सीला काम दयावे?

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : आम्ही तुमच्या समोर ठेवला आहे. समितीने योग्य त्याच्यावर विचार करावा.

श्री.राजू शिंदे : एखादा विषय पत्रिकेत घेण्याअगोदर मा.सभापती व सचिव यांना कळविणे महत्त्वाचे आहे. किंवा निविदा न काढण्याचे कारण सांगणे महत्त्वाचे आहे यासाठी प्रशासन जबाबदार आहे. स्थायी समितीकडून नवीन प्रक्रिया राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. त्या आदेशाचे प्रशासनाने पालन नाही केले. घनकचरा व्यवस्थापनाबद्दल उपस्थित अधिकाऱ्यांना पुरेशी माहिती नाही. व संबंधित अधिकारी सभेस अनुपस्थित आहे. ३ महिन्यापासून नवीन प्रक्रिया काढण्यात आली नाही व त्याच एजन्सीला काम मिळावे यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. कोणताही समाधानकारक खुलासा न देता त्याच एजन्सीचा प्रस्ताव सभागृहात संबंधित अधिकाऱ्यांनी मांडला आहे.

मा.सभापती : संबधित अधिकाऱ्यांना कामाचे गांभीर्य नाही. व सभेस गैरहजर राहण्यासाठी सबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी देखील घेतली नाही.

मा.नगरसचिव : २४ तासांच्या अगोदर प्रस्ताव मा.सभापती किंवा नगर सचिवांस सादर करणे गरजेचे असते.

श्री.राजू शिंदे : एजन्सीने पाहणी न करता अहवाल देण्यात आला, श्री निपाणीकर यांनी घरे पाडण्याचे आदेश दिले त्यानुषंगाने घरे पाडण्यात आले व कर्ज काढून घरांचे बांधकाम चालू आहे आणि डेव्हलपमेंट फी भरल्यांनतर आरक्षण असल्याचे सांगण्यात आले यावर तेथील लोकांनी काय करावे?

कनिष्ठ अभियंता : मिसरवाडी नारेगाव येथे पाहणी करण्यात आली आहे तेथील बिल्डिंग परमिशन घेतलेल्या १२ लाभार्थींना आज अनुदान वाटप करण्यात येईल व बांधकाम परवानगी आल्यांनतर पुढील कारवाई करतो.

श्री.अब्दुल नाविद : माझ्या वार्डातही अशाच प्रकारचे अतिक्रमण करण्यात आले आहे. पंतप्रधान आवास योजना अंतर्गत घरे पाडल्यानंतर मनपाकडून बांधकाम परवानगी घेतली, पहिला टप्पाचे पैसे देण्यात आला परंतु दूसरा टप्पाचे हप्ता देण्यास प्रशासन तयार नाही.

मा.उपआयुक्त(श्री.मोरे) : पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ज्यांनी नियमाप्रमाणे बांधकाम केले त्यांना दुसरा टप्पा देण्यात येतो.

कनिष्ठ अभि.(श्री.रामदासी) : पंतप्रधान आवास योजनेच्या नियमावलीमध्ये अशी तरतूद आहे कि २०० लाभार्थी आहेत त्यापैकी ७५ टक्के म्हणजे १५० लाभार्थी पूर्ण होत नाही तोपर्यंत केंद्र शासन अनुदान वितरीत करीत नाही, अनूदान आल्याशिवाय मनपाला दुसरा टप्पा वितरीत करता येत नाही असे सदस्यांना पूर्वीही तोंडी सांगण्यात आले आहे. लाभार्थी पूढाकाराची योजना आहे जोपर्यंत लाभार्थी बांधकाम परवानगी घेत नाही व बांधकाम करत नाही तोपर्यत अनुदान देऊ शकत नाही.

श्री.राजू शिंदे : केंद्र शासन, राज्य शासन किंवा मूलभूत अनुदान आणण्यासाठी काही सिस्टिम मनपाकडे आहे का? बांधकाम परवानगीला शिथिलता देण्याचा शासनाचा नवीन जी.आर. मिळालेला आहे का तुम्हांला?

कनिष्ठ अभि.(श्री.रामदासी) : बांधकाम परवानगीला शिथिलता दिल्याचा जी.आर. माझ्या पाहण्यात नाही

श्री.अब्दूल नावीद : माझ्या वार्डात बांधकाम परवानगी घेतल्यानंतर घरे तोडण्यात आलेली आहे, लाभार्थीची आर्थिक परिस्थिती नाही व घराचे भाडे भरण्याचे पैसे देखील नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिला टप्पा आल्यांनतर केंद्र शासनाचे अनुदान कधी येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा

कनिष्ठ अभि.(श्री.रामदासी) : लाभार्थी पुढाकार योजना असल्याने लाभार्थीने स्वखर्चातून घर बांधणी करावी व जेव्हा केंद्र शासनाचे अनुदान आल्यानंतर त्यांना वाटप करण्यात येईल.

श्री.अब्दूल नावीद : ज्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे असे लाभार्थीच्या नावांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे त्यांनी बांधकामाचा खर्च कसा करावा?

मा.सभापती : सन्माननीय सदस्यांच्या समस्येचा सविस्तर अभ्यास करुन माहिती सदस्यांना देण्यात यावी.

श्री.राजू शिंदे : शासकीय अनुदानाचा पाठपुरावा करण्यासाठी मनपामध्ये काही सिस्टिम आहे असे अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र अधिकारी प्रशासनाने नेमावे.

मुख्यलेखाधिकारी : प्रत्येक विभागाचे प्रमुख त्या त्या विभागाचे अनुदान आणण्यासाठी प्रयत्न करतात.

श्री.राजू शिंदे : मूलभूत विभागाच्या अनुदान प्रक्रियासंबधी कामे कोण बघतात? अनुदानाचे पैसे कलेक्टर ऑफिसमध्ये आलेले आहे. अशी माझी माहिती आहे.

मुख्यलेखाधिकारी : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात प्रशासकीय मंजूरीने जी.आर बनतो त्या आधारावर पीटीअस् केले जाते त्या सिस्टिम मधून पैसे मनपाच्या ट्रेझरीत येतात व त्या मंजूरीचे पैसे अद्याप मनपाच्या खात्यावर आलेले नाही. तेथील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी (श्री राठोड) शासनाकडून पैसे आल्यांनतर लवकरात लवकर व्हाउचर मनपा खात्यावर टाकण्याचे सांगितले आहे.

श्री.राजू शिंदे : मनपाचे बरेच प्रशासकीय कामे तहसील कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, शिक्षण विभागाचे १०० कोटी रु. बाकी आहेत यासारख्या आर्थिक कामे पाहण्यासाठी एक अधिकाऱ्याची नेमणूक केली पाहिजे कारण शहराची विकास कामे त्यावर अवलंबून आहे. नारेगाव येथील घरकुलची प्रकरणे आरक्षणामध्ये आली असता तर सर्वे करतांना ची बाबी समोर का आल्या नाही?

एजन्सी प्रमुख(श्री.निपाणीकर): मिसरवाडी नारेगाव येथील ग्रीनझोन सर्वसाधारण सभेत ठराव पारित केला आहे नगर रचना विभागाकडे फाइल पाठविण्यात आली आहे. मा.अतिरिक्त आयुक्तांच्या आदेशावरुन घरे पाडण्याचा आदेश देण्यात आले. बांधकाम परमिशन घेतल्यांनतर शासनाकडून अनुदान मिळेल.

श्री.राजू शिंदे : घरे पाडल्यानंतर आरक्षणात असल्याचे सांगण्यात आले आहे यासाठी कोण जबाबदार आहे, त्या लाभार्थ्यांची नुकसान भरपाई कोण देणार?

एजन्सी प्रमुख (श्री.निपाणीकर): आर्क असोसिएट नावाच्या एजन्सीची प्रति घर रु.१५०० दराने आरक्षीत जागांची ग्रीन झोन, आरक्षणात येणाऱ्या जागेची पाहणी करुन डी.पी.आर तयार करणे यासाठी त्यांची नेमणूक केली आहे आतापर्यंत ७३१ घरांचा डी.पी.आर नोव्हेंबर २०१८ मध्ये मंजूर झाला आहे. परंतु त्यांनी गुगलच्या आधारे माहिती दिल्याने आरक्षणातील घरे पाडण्यात आली आता आम्ही स्वतः जागेची पाहणी करुन ग्रीन झोन, यलो झोन, रोड कटींगमध्ये येणाऱ्या ११६ सोसायटीचा डी.पी.आर तयार केला आहे.

श्री.राजू शिंदे : आरक्षणात असलेले घरे पाडण्यासाठी पूर्णतः एजन्सी जबाबदार आहे या सर्वांची नुकसान भरपाई या एजन्सीकडून करण्यात यावी. ८०,८१५ घरांचे ॲपलीकेशन आपल्याकडे आले आहेत त्यानुसार एजन्सी मनपाकडून पैसे घेणार आहे संबधित आरक्षित असलेल्या घरे पाडण्यात आले त्यासाठी व्याजासकट नुकसान भरपाई घेण्याची फाईल पुटअप करण्यात यावी व अशी त्रुटी पून्हा निघाल्यास एजन्सी जबाबदार राहील अशी अट कॉन्ट्रक्टमध्ये देखील आहे.

श्री.अब्दुल नावीद : राहुलनगर येथेही घरे पाडण्यात आली आहे त्या लोकानाही नुकसान भरपाई दयावी.

मा.सभापती : सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे संबधित एजन्सीने लाभार्थ्यांचे झालेल्या नुकसानाची भरपाई करुन दयावी.

श्री.गजानन बारवाल : मुंकुदवाडी ते पंचवटी हॉटेल, पद्‌मपुऱ्यांतील मुख्य रस्ता या रस्त्यांचे ९ महिन्यापासून काम बंद आहेत याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

कार्य.अभि(श्री.कोल्हे) : सर्व रस्त्यांचे ८०-८५ टक्के काम पूर्ण होत आले आहे. पद्‌मपुऱ्यातील रस्त्याचे काम उदयापासून चालू करणार आहोत

मा.सभापती : रस्त्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. निवडणुक आलेली आहे,असलेले बजेट खर्च करावे.

श्री.राजू शिंदे : जे अधिकारी आज सभेस अनुपस्थित आहेत त्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्यात यावे

श्रीमती.सायरा बानो : शहागंज येथील पाण्याच्या टाकीची बॉड्री वॉल तुटलेली आहे त्या बाजुलाच दारुचे दुकान असल्याने तेथील लोक पाण्याच्या टाकीतील पाणी दुषित करत आहे व तेच पाणी नागरिकांना पिण्यास येते. दुरुस्तीसाठी मागणी केल्यावर कोणतेच अधिकारी कामाची दखल घेत नाही.

वार्ड अभि.(श्री.संधा) : संबंधित कामाचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहे ८ दिवसात काम चालू करण्यात येईल.

मा.सभापती : ८ दिवसांचा कालावधी न लावता त्वरित कारवाई करण्यात यावी. कामास सुरुवात करावी.

श्री.राजू शिंदे : मास्को कॉर्नर ते महाराष्ट्र डिस्टीलरी १०० फुटीचा रस्त्याचे काम अतिशय खराब क्वालिटीचे झाले व पीएमसीने देखील या कामाकडे दुर्लक्ष केले. संबधित अधिकाऱ्यांनी रस्त्याची तपासणी करावी व काम समाधानकारक नसल्यास पीएमसी वर लेखी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

कार्य.अभि (श्री.कोल्हे) : सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पीएमसी अधिकाऱ्यांसोबत रस्त्यांची तपासणी करतो.

श्री.नासेर सिद्दीकी : माझ्या वार्डात ४ वर्षापुर्वी ललवाणी नावाच्या एका व्यक्तीने TDR घेण्यात आले आहे. TDR रद्द करण्यात यावे किंवा ती जागा ताब्यात घेण्यात यावी. मी वारंवार पत्र व्यवहार केला याचा संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील सभेत खुलासा करण्यात आला नाही तर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती : संबंधित विषयाची अधिकारी यांनी शहानिशा करावी. प्रत्येक्ष पाहणी करुन सन्माननीय सदस्यांना लेखी माहिती देण्यात यावी. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे समाधानकारक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आज सभेस गैरहजर असलेले अधिकाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्यात यावे.

श्रीमती सायरा बानो : स्थायी समितीच्या सभेला मा.आयुक्तांनी सुध्दा हजर राहणे आवश्यक आहे. यापुढे आयुक्तांनी सभेला उपस्थित राहावे अशी सर्व सदस्याची सुध्दा तीच मागणी आहे.

मा.सभापती : याबाबत आयुक्तांना कळविण्यात येईल.

या बरोबरच मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद